# एक गाव खाते वर्षभरात १० लाखांचा तंबाखू!

## धक्कादायक सर्वेक्षण : गडचिरोली जिल्ह्यातील गावे व्यसनांमुळे 'खोकली'

**प्रमोद काळबांडे** : सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २९ : गडचिरोली जिल्ह्यातील दारूबंदी कागदोपत्रीच असल्याचे सर्वश्रुत असतानाच, जिल्ह्यातील गावेच्या गावे तंबाखू खाऊन 'खोकली' झाल्याचे भयाण चित्र उजेडात आले आहे. १,८०० लोकवस्तीच्या मुडझा या एकाच गावात १० लाख रुपयांचे तंबाखूजन्य पदार्थ वर्षभरात चघळले जातात, असा धक्कादायक निष्कर्ष एका सर्वेक्षणातून निघाला आहे. आश्चर्य म्हणजे १० लाख रुपये चघळून चुराडा करणाऱ्या या गावच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामविकासाचे व रोजगार हमी योजनेचे बजेट मात्र १० लाखांहून कमी आहे. येथील २७ टक्के लोक वयाच्या सहाव्या वर्षापासून तंबाखूयुक्त पदार्थ खातात.

गडचिरोली जिल्ह्यात दोन शहरे तर लोकवस्तीची १,५१३ गावे आहेत. यापैकी बव्हंशी गावे तंबाखूच्या भीषण विळख्यात सापडली आहेत. छोट्या मुलांपासून बड्या बुजूर्गांपर्यंत सारेच तंबाखू खातात. हे प्रमाण किती आहे, या विषयी नुकतेच एक सर्वेक्षण गोपाळ महाजन या तरुणाने केले. 'सर्च' संस्थेच्या 'फेलोशिप'वर काम करीत गडचिरोली जिल्ह्यातील प्रश्न. समजून घेण्यासाठी गोपाळ महिनाभर मुडझा या गावात वास्तव्यास होता. सकाळ-दुपार-संध्याकाळ जमेल त्या वेळेस त्याने येथील ५१ कुटुंबांना नियमित भेटी दिल्या.

प्रत्येकच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीसोबत बोलत त्याने नोंदी केल्या. सर्वेक्षणाअंती निघालेल्या एकेका निष्कर्षामुळे तो अक्षरशः हादरलाच. येथील २७ टक्के लोकांनी ६ ते १४ वर्षे वयाचे असतानाच तंबाखू खायला सुरुवात केल्याचे पाहून, त्याला या प्रश्नाची तीव्रता ध्यानात आली.

मुडझा हे ४३६ कुटुंबांचे गाव. येथील सर्वेक्षण केलेल्या ५१ कुटुंबापैकी ४३ कुटुंबांत कुणी ना कुणी तंबाखूच्या आहारी गेल्याचे आढळले. हे प्रमाण ८४ टक्के होते. या कुटुंबांतील २०४ सदस्यांपैकी १०८ सदस्य तंबाखू सेवन करणारे आहेत.

पान २ वर ▶



**घ्या खर्रा!** : तंबाखू, खर्रा, गुटखा आदी तंबाखूयुक्त पदार्थ देवाणघेवाणीचे सर्वोत्तम साधन झाले आहे. खर्रा 'शेअर' करणारे मुडझा येथील तरुण.

# एक गाव खाते वर्षभरात १० लाखांचा तंबाखू!

▶ पान १ वरून

यात ४८ स्त्रिया तर ६० पुरुष आहेत. तंबाखू सेवनाचे हे प्रमाण ५३ टक्के एवढे आहे. म्हाताऱ्यांकडे पैसा कमी असल्यामुळे त्यांचे प्रमाण कमी आहे. आपण तंबाखू, खर्रा, गुटखा खातो. त्यासाठी विनाकारण पैसा खर्च करतो. हे येथील अनेकांना माहिताहे. अनेकजण हे कबूलही करतात; परंतु तंबाखू सोडण्याविषयीची येथे जनजागृती खूपच कमी आहे. कुणी सोडण्याची इच्छा मनात बाळगून असले, तरी हे पदार्थ सहज कुठेही उपलब्ध असतात. ते सतत डोळ्यासमोरच असल्याने व्यसन सोडणे खूप कठीण आहे. काहीतरी 'शौक' असला पाहिजे, या खोट्या प्रतिष्ठेपायी आणि हाताशी पैसा असल्याने व्यसन सुटता सुटत नाही, असे दिसते.

**सर्वत्र मिळते गुटखा, तंबाखू, विडी, गुल**


गडचिरोली जिल्ह्यातील अनेक गावे छोटी आहेत. या प्रत्येकच गावात सर्वच जीवनावश्यक वस्तू मिळत नसल्या तरी तंबाखू, गुटखा, खर्रा, नस, विडी, सिगारेट, पान, गुल, गुडाखू हे सर्व तंबाखूयुक्त पदार्थ उपलब्ध असतात. मुडझा गावात १० पानठेले, तर सात किराण्याची दुकाने आहेत. या सतरा ठिकाणांहून दररोज २,६९० रुपयांचे आणि आठवड्याला १८,८३० रुपयांचे उपरोक्त पदार्थ विकले जातात.

**कुटुंबप्रमुखच देतो मुले व पत्नीला तंबाखू!**

मुडझा गावातील कटुंबप्रमुख पुरुष हा तंबाखूयुक्त पदार्थ सेवनाच्या वर्तुळात केंद्रबिंदू असून महिला आणि मुले हे परिघाला आहेत. पुरुष तंबाखूयुक्त पदार्थ विकत घेऊन स्वतः खातो तसेच बायको व मुलांनादेखील देतो. येथील २३ टक्के महिला लग्नानंतर नवऱ्याने दिले म्हणून, शेजारील बाया खातात म्हणून, कामावरील कुणीतरी खातात आदी कारणांमुळे तंबाखूयक्त पदार्थ सेवन करायला लागले. २२ टक्के कुटुंबे घरातील लहान मुलांना तंबाखू खायला देतात. तंबाखूयुक्त पदार्थ सेवन करणाऱ्या पुरुषांचे प्रमाण ६१ टक्के तर महिलांचे ४६ टक्के आहे. गेल्या पाच वर्षांत महिलांचे सेवन करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. असे म्हटले जाते की, कामात असल्यास व्यसनाची आठवण येत नाही; परंतु इथे तसे नाही.

**खर्रा ब्रॅण्डवर सर्वाधिक खर्च**

गोपाळ महाजनने सर्वेक्षणाची पद्धतीही समजावून सांगितली. "प्रत्येक कुटुंबात तंबाखूयुक्त पदार्थांवर किती पैसे खर्च केले जातात, हे दर आठवड्याला प्रत्येक कुटुंबाकडे जात विचारायचो; परंतु आठवड्याचे कुणाच्याही लक्षात राहायचे नाही. मग दररोज जात प्रत्येक व्यक्ती, कोणत्या ब्रॅण्डवर किती खर्च करतो, हे विचारायचो. सुगंधित तंबाखू, सुपारी आणि चुना यांचे मिश्रण असलेल्या खर्रा या ब्रॅण्डवर एकूण खर्चाच्या ८३ टक्के खर्च केला जातो. येथील ५३ टक्के लोकांनी १५ ते २५ या वयात तंबाखूयुक्त पदार्थ खायला सुरुवात केली आहे," असे त्याने सांगितले.



मुडझा गावात महिनाभर थांबून सर्वेक्षण करणारा गोपाळ महाजन. महिनाभर परिश्रमपूर्वक नोंदी करून तो धक्कादायक निष्कर्षाप्रत पोचला.

## अनुत्तरित प्रश्न?

५१ कुटुंबांपैकी ४३ कुटुंबांत तंबाखूयुक्त पदार्थ सेवन केले जात असतील तर गडचिरोली जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील एकूण १,९५,३८३ कुटुंबांपैकी १,६४,७३५ एवढी कुटुंबे तंबाखूयुक्त पदार्थांचे सेवन करत असतील काय? 'ओव्हरऑल कन्क्लुजन' काढता येईल काय, असे गोपाळ महाजनला विचारले. "असा निष्कर्ष काढणे कठीण आहे. परंतु, गडचिरोली जिल्ह्यात व्यसनाधीनतेचे प्रमाण खूप मोठे आहे", असे तो म्हणाला. "येथील अनेक लोकांना तंबाखू हे खूप वाईट व्यसन आहे, असे वाटत नाही. उलट ते आदानप्रदान आणि देवाणघेवाणीचे प्रतिष्ठाप्राप्त साधन झाले आहे," अशी खंत त्याने व्यक्त केली.

## तंबाखूजन्य पदार्थांवरील खर्च

- ▶५१ कुटुंबांचा एका आठवड्याचा खर्च : २,२२८ रुपये
- ▶५१ कुटुंबांचा एका वर्षाचा खर्च : १,१५,८५६ रुपये
- ▶मुडझा गावाचा (४३६ कुटुंबे) एका आठवड्याचा खर्च : १९,०४७ रुपये
- ▶मुडझा गावाचा (४३६ कुटुंबे) एका वर्षाचा खर्च :९,९०,४५५ रुपये
- ▶एका कुटुंबाचा एका आठवड्याचा सरासरी खर्च : ४३.७० रुपये

## दृष्टिक्षेपात गडचिरोली जिल्हा

| | |
|---|---|
| ▶जिल्ह्यात दोन शहरे व लोकवस्तीची गावे | : १,५१३ |
| ▶जिल्ह्यातील एकूण कुटुंबे | : २,१०,३६२ |
| ▶ग्रामीण भागातील कुटुंबे | : १,९५,३८३ |
| ▶नागरी भागातील कुटुंबे | : १४,७९७ |
| ▶दारिद्य रेषेखालील कुटंबे | : एक लाख १६ हजार |
| ▶निव्वळ दरडोई उत्पन्न | : १७,९८४ रुपये |